नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०३/२०१६
(सुरेश पाटील – वादी वि. श्रीपाद पाटील वगैरे –प्रतिवादी)

## :– नि. ५६ खालील आदेश –:

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्रतिवादी नं.०६ श्री. श्रीपाद पुरुषोत्तम दाभोलकर हे दिनांक ०७/१२/२०२० रोजी मयत झाले असून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन की, प्रतिवादी नं.०६ मयत झाल्यानंतर त्यांचा मृत्यु दाखला वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे व कोरोना साथीच्या महामारीमुळे त्यांना मुदतीत त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्याचे कामी सामील करण्यास विलंब झालेला आहे. तरी प्रतिवादी नं. ०६ चे वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी नं. ५ व ७ यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे . त्यांचे म्हणणे की,अर्जामध्ये वादीने किती दिवसाचा विलंब झाला याबाबत जाणीवपूर्वक उल्लेख केलेला नाही. विलंब माफीचे कारण संयुक्तीक नाही. तरी अर्ज नामंजुर करण्यात यावा व अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रतिवादींना रक्कम रुपये १०००/– इतका खर्च देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आली आहे. इतर प्रतिवादींना उचित संधी देवूनही त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल न केल्याने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविण्यात आलेला आहे.

४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते.

त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. ०६ हे दिनांक ०७/१२/२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु वारस दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, हक्कप्रस्थापना व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं. ०६ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा विलंब माफ करणेकरीता ५६ कडील अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु वादीने सदरचा अर्ज अतिशय विलंबाने दिलेला असल्यामुळे त्याच्यावर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. ५६ कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ५ व ७ यांना रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे मात्र ) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी नं.०६ यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/–

दिनांक– ०४/०१/२०२२

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.